# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः05.04.2024** **वारःशुक्रवार**

---

1. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी देशातल्या निवडक पालिका आयुक्तांची आज नवी दिल्लीत परिषद
2. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची आज होणार छाननी
3. रिझर्व बँक या आर्थिक वर्षासाठीचं पहिलं द्वैमासिक पतधोरण आज जाहीर करणार आणि
4. देशातल्या पूर्व आणि किनारीपट्टीच्या भागात उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा इशारा

**बैठक**

केंद्रीय निवडणूक आयोगानं मतदानाचा अत्यल्प टक्का असलेल्या देशातील 11 राज्यांमधील निवडक महापालिकांचे आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांची स्वतंत्र परिषद आज आयोजित केली आहे. नवी दिल्ली इथं होत असलेल्या या परिषदेत आगामी लोकसभा निवडणुकांमध्ये मतदारांचा मतदानासाठी प्रतिसाद वाढविण्याच्या दृष्टीनं विविध उपाययोजनांवर चर्चा होणार आहे. या राज्यांच्या काही ग्रामीण आणि काही शहरी भागांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विशिष्ट कृती आराखडा जाणीवपूर्वक तयार करण्यात येणार आहे. निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार, या बैठकीमध्ये पुण्यासह मुंबई, दिल्ली, चेन्नई, बंगळूरू, हैद्राबाद, अहमदाबाद, ठाणे, नागपूर, पटना साहिब, लखनौ आणि कानपूर या पालिकांचे आयुक्त आणि बिहार आणि उत्तर प्रदेशमधील निवडक जिल्हा निवडणूक अधिकारी सहभागी होणार आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या परिषदेत ज्ञानेश कुमार आणि सुखबीर सिंग संधू हे आयुक्तही सहभागी होणार आहेत. शहरी भागातील जनतेची उदासीनता आणि ग्रामीण भागातून शहरांकडे होणारं स्थलांतर ही मतदानाची टक्केवारी वाढत नसल्याची प्रमुख कारणं असून ती यंत्रणेपुढील मोठी आव्हानं असल्याचं मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी वेळोवेळी अधोरेखित केलं आहे.

**छाननी**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज होणार आहे. जम्मू-काश्मीरमध्ये अर्जाची उद्या छाननी होणार आहे. या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. या दुसऱ्या टप्प्यात, 12 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील 88 लोकसभेच्या जागांसह बाह्य मणिपूर लोकसभा मतदारसंघाच्या उर्वरित भागासाठी 26 एप्रिलला मतदान होणार आहे. या दुसऱ्या टप्प्यात केरळच्या 20 जागा, कर्नाटकच्या 14 जागा, राजस्थानच्या 13 जागा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राच्या प्रत्येकी आठ जागा, मध्य प्रदेशच्या सात जागा, आसाम आणि बिहारच्या प्रत्येकी पाच जागा आणि पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधल्या प्रत्येकी तीन जागांसाठी मतदान होणार आहे. तसंच मणिपूर, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरमधल्या प्रत्येकी एका जागेसाठीही मतदान होणार आहे.

**निवडणूक अर्ज**

दरम्यान उमेदवारी अर्ज भरण्याच्या कालच्या अखेरच्या दिवशी अनेक महत्त्वाच्या उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. एच. डी. कुमारस्वामी यांनी कर्नाटकमधील मंड्या इथून, के. सी. वेणुगोपाल यांनी केरळमधील

अलापुझ्झा इथून आणि हेमा मालिनी यांनी उत्तर प्रदेशमधील मथुरा मतदार संघामधून आपले उमेदवारी अर्ज काल दाखल केले. अभिनेते सुरेश गोपी यांनी त्रिचूर इथून तर के. सुरेन्द्रन यांनी वायनाड इथून आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

**<u>उमेदवारी अर्ज</u>**

महाराष्ट्रात बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या 8 लोकसभा मतदारसंघात या टप्प्यात मतदान होणार आहे. यासाठी कालअखेर एकंदर 352 उमेदवारांनी 477 अर्ज दाखल केले आहेत. अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी काल विविध पक्षातील उमेदवारांनी, पक्षातील वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत शक्ती प्रदर्शन करत, आपले उमेदवारी अर्ज भरले.

**<u>सीपीआय(एम) जाहीरनामा</u>**

अतिश्रीमंतांवरील कर, सामान्य संपत्ती कर आणि वारसा करावरील कायदा तसंच खाजगी क्षेत्रातील आरक्षण, आणि राजकीय पक्षांना कॉर्पोरेट कंपन्यांच्या देणग्यांवर बंदी घालणं हे मुद्दे आपल्या लोकसभा निवडणुकीच्या जाहिरनाम्याचा भाग आहे, असं भारतीय मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीनं म्हटलं आहे. या जाहिरनाम्यात सीपीआयनं आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंध कायदा रद्द करण्याचं आश्वासन दिलं आहे. पक्षाचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांच्या उपस्थितीत काल नवी दिल्लीत पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. यावेळी प्रकाश करात, वृंदा करात, नीलोत्पल बसू आणि तपन सेन उपस्थित होते. आपला पक्ष देशात लोकशाही आणि धर्मनिरपेक्षता अधिक सक्षम करेल, असं सीताराम येचुरी यावेळी म्हणाले.

**<u>भाजप जाहीरनामा</u>**

भाजपच्या निवडणूक जाहीरनामा समितीची बैठक काल नवी दिल्लीत झाली. ही समिती आगामी लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाचा जाहीरनामा ठरवणार आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखालील या 27 सदस्यीय समितीची काल झालेली ही दुसरी बैठक होती. या बैठकीला पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या निर्मला सीतारामन, अश्विनी वैष्णव, किरेन रिजिजू आणि इतर उपस्थित होते. दरम्यान काँग्रेस पक्ष लोकसभा निवडणुकीसाठीचा जाहीरनामा आज प्रसिद्ध करणार आहे.

**<u>प्रचार</u>**

देशात पहिल्या टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज राजस्थानातील चुरू इथं निवडणूक प्रचार सभेला संबोधित करणार आहेत. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी काल चितोडगड इथं प्रचार सभेला संबोधित केलं.

**<u>मोदी टीका बंगाल</u>**

पश्चिम बंगालमध्ये केंद्र सरकार पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी होऊ न दिल्याबद्दल पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल तृणमूल काँग्रेसवर टीका केली. ते काल कूचबिहारमध्ये एका जाहीर सभेला संबोधित करताना म्हणाले की, केंद्रानं निधी देऊनही अनेक प्रकल्प पश्चिम बंगालमध्ये वेळेत पूर्ण झालेले नाहीत. तसंच संदेशखाली प्रकरणातल्या आरोपींना संरक्षण देण्यासाठी तृणमूल काँग्रेस सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याची टीकाही मोदी यांनी केली. दरम्यान तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनीही कूचबिहारच्या माथाभंगा इथं जाहीर सभेला संबोधित केलं.

पश्चिम बंगालमध्ये नागरिकत्व सुधारणा कायदा लागू केलं जाणार नाही, असं त्या म्हणाल्या. जलपाईगुडीच्या माळ इथंही ममता बॅनर्जी यांनी जाहीर सभा घेतली.

## निवडणूक आयोग-टाईमलॉटस

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी दूरदर्शन आणि आकाशवाणीवरून राष्ट्रीय पक्षांना प्रक्षेपण आणि प्रसारणासाठीच्या वेळेचा क्रम निश्चित करण्यासाठी काल नवी दिल्लीत सोडत काढण्यात आली. यामध्ये प्रत्येक राष्ट्रीय पक्षाला दूरदर्शन आणि आकाशवाणीवर स्वतंत्रपणे 45 मिनिटांचा प्रसारण कालावधी देण्यात आला आहे. तर सहा राष्ट्रीय पक्षांना अतिरिक्त पाच तास तीस मिनिटांचा प्रक्षेपण कालावधी देण्यात आला आहे. 16 आणि 23 एप्रिलला तसंच मे महिन्याच्या 3, 10, 17, 22 आणि 29 या तारखांना हे प्रसारण करता येईल.

## रिझर्व्ह बँक

भारतीय रिझर्व्ह बँक चालू आर्थिक वर्ष 2024-25 साठीचं आपलं पहिलं द्वैमासिक पतधोरण आज जाहीर करणार आहे. बँकेचे गव्हर्नर शक्तीकांत दास यांच्या अध्यक्षतेखाली तीन दिवसीय विचार मंथन बैठकीला बुधवारी सुरुवात झाली. या बैठकीत झालेले निर्णय आज जाहीर करण्यात येणार आहेत. यंदाच्या आर्थिक वर्षात अशा सहा बैठकांचं नियोजन करण्यात आलं आहे. रिझर्व्ह बँक यावेळी पुन्हा एकदा आपले महत्त्वाचे व्याजदर न बदलता तसेच कायम ठेवेल आणि महागाई नियंत्रणावर लक्ष केंद्रित करेल, असा देशातील प्रमुख अर्थतज्ज्ञांचा अंदाज आहे. गेल्या वेळी फेब्रुवारी 2024 मध्ये बँकेनं आपला रेपो दर 6 पूर्णांक 5 दशांश टक्क्यांपर्यंत वाढवला होता आणि नंतर 5 धोरणांमध्ये तो कायम ठेवला होता.

## हवामान

भारतीय हवामान विभागानं पुढील दोन दिवसात देशाच्या पूर्व आणि किनारपट्टीच्या भागात उष्णतेची लाट येण्याचा अंदाज वर्तवला आहे. प्रामुख्यानं उत्तर कर्नाटकच्या काही भागात, ओडिशा, पश्चिम बंगालचा गंगेजवळील भाग, झारखंड, तेलंगण, आंध्र प्रदेशचा तटवर्ती भाग, यानम, रायलसीमा भागात ही लाट असेल, असं हवामान विभागान म्हटलं आहे. दरम्यान, ईशान्य भारतात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता रविवारपर्यंत कायम राहणार असल्याचं तसच याच काळात अरुणाचल प्रदेशमध्ये मुसळधार पाऊस आणि हिमवृष्टी आणि उद्या अतिमुसळधार पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागान स्पष्ट केलं आहे. आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा इथं हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. केरळ, तमिळनाडू, पुद्दुचेरी, करायकल, कोकण आणि गोव्यात उष्ण हवामान कायम राहण्याचा अंदाज आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.